## परिशिष्ट ४

# रामचंद्र भिकाजी गुंजीकर

(चरित्र व वाङ्मय कार्य)

रामभाऊ गुंजीकर यांनी 'मोचनगड' ही कादंबरी लिहून मराठी कथावाङ्मयाला नवे वळण लावले इतकेच नाही. तर मराठी भाषेच्या उत्कर्षाला त्यांनी अनेक प्रकारे हातभार लावलेला आहे. गुंजीकरांच्या घराण्याचे मूळ नाव केंकरे पोर्तुगीजांच्या धर्मछळाला कंटाळून त्यांचे पूर्वज बेळगाव जिल्ह्यातील गुंजी नावाच्या गावात येऊन स्थायिक झाले व त्यामुळे या कुटुंबाला पुढे गुंजीकर असे उपनाम मिळाले. रामभाऊंचा जन्म ३० एप्रिल १८४३ रोजी बेळगांव जिल्ह्यातील जांबाई नावाच्या परगण्यांत झाला. त्यांचे वडील भिकाजीपंत हे वत्सगोत्री ब्राह्मण होते. आईचे नांव लक्ष्मीबाई. भिकाजीपंतांना, मंगेश (१८४१), रामचंद्र (१८४३), काशीबाई (१८४९) व गणपतराव (१८५१) अशी मुले होती.

रामभाऊंचे प्राथमिक शिक्षण जंबोरीच्या शाळेत झाले. इंग्रजी शिक्षकाकरितां ते बेळगावास गेली. १९६२ च्या सुमारास पुढील शिणक्षणाकरितां मुंबईला एस्फिस्टन हायस्कुलात गेले व १८६४ च्या नवबंर महिन्यात प्रवेशपरीक्षेमध्ये चांगल्या प्रकारे उत्तीर्ण झाले. सरदार हायस्कुलांतून त्यांना दहा रुपयाची शिष्यवृत्ती मिळे. इतर खर्चाकरिता त्यांना शिकवण्या कराव्या लागत. त्यावेळी बी.ए. पदवी मिळविण्यासाठी कॉलेजात तीन वर्षे घालवावी लागत. १८६६ मध्ये नवंबरात ते 'फस्ट एक्झामिनिशन इन आर्टस् या परिक्षेला बसले पण पत्नीच्या दीर्घ आजारामुळे त्यांना लक्ष देता आले नाही त्यामुळे या परीक्षेत यश मिळाले नाही व येथेच त्यांच्या शिक्षणाचा दुर्दैवाने शेवट झाला व उदर निर्वाहाकरिता न्यू चर्चमध्ये एल्फिस्टन हायस्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी धरावी लागली नोकरी धरल्याबरोबर लगेच चार महिन्यानी जुलै १८६७ पासून 'विविध ज्ञानविस्तार' हे मासिक सुरू केले. परक्या इंग्रजी भाषेच्या नादी लागून स्वभाषेचा कंटाळा व तिरस्कार करणाऱ्या 'नवीन विद्वानांच्या अविचारा'वर त्यांनी एकसारखी झोड उठवली होती. ख्रिस्ती मिशनरींच्या हल्ल्यांना तोंड देण्याकरिता त्यांनी 'दंमहारज' नावाचे दुसरे एक मासिक ऑक्टोंबर १८७१ पासून चालू केले.

मराठी ही हिंदूस्थानातील सर्वोत्कृष्ट भाषा आहे. हे गुंजीकरांनी 'विस्ताराख्या' पहिल्याच अंकात दाखविले आहे. मराठीचा एवढा जरी त्यांचा जाज्वल्य अभिमान होता. तरी राष्ट्रभाषा म्हणून हिदूस्थानी भाषेचा 'विस्तार होऊन जर तेणेंकरून इतर भाषांचा लोप होण्याचा योग घडून आला, तर त्यामुळे कोणास काही दु:ख किंवा तोटा होऊ नयेच'' असे त्यांनी उद्‌गार काढले आहेत. कन्नड परिज्ञान, नांवाचे कानडी भाषेचे ज्ञान करून घेण्याचे त्यांनी स्वतंत्र पुस्तकही पुढे लिहिले. संस्कृत

भाषेचा त्यांचा व्यासंग जाडा होता. भगवद्‌गीता व अभिज्ञानशांकुतल यांची त्यांनी केलेली मराठी भाषांतरे प्रसिद्ध आहेत; परंतु का.पां.परब यांच्या सहकार्याने 'कौमुदी महोत्साह' नावाचे सुप्रसिद्ध सिद्धांत कौमुदीचे मराठी भाषांकर ते त्रैमासिक स्वरुपात प्रसिद्ध करीत असत. मराठी वाङ्‌मय समीक्षेचा पाया, समकालीन काव्ये, कादंबऱ्या, नाटके व इतर ग्रंथावर परीक्षणे लिहून, गुंजीकरांनी घातला. 'काव्यविचार' हा गुंजीकरांचा विषय जरी अपुरा राहिला. तरी पुढील मराठी साहित्यावरील लेखकांना प्रेरक झाला असला पाहिजे. मुलांकरिता त्यांनी सुबोध मराठी व्याकरण लिहिले होते. 'महाराष्ट्र भाषेची लेखनशुद्धी' नावाचे मराठी शुद्धलेखावरील एक पुस्तक त्यांनी १८६९ साली प्रसिद्ध केले.

प्रस्तुत 'मोचनगड' ही कादंबरी त्यांनी विविध ज्ञानविस्ताराच्या पहिल्याच अंकापासून सुत केली. गुंजीकरांची दुसरी कादंबरी 'गोदावरी' ही पोर्तुगीजांच्या इंक्विनझिशन वर आधारलेली होती. शेक्सपीयच्या ठेशे रपव र्गीश्रळशीं या नारकांचे मराठी रुपांतरही त्यांनी विस्तारातून क्रमश: प्रसिद्ध केले. त्याला 'शेमकेतू विजया' असे नाव दिले आहे. महाराष्ट्रीय ब्राह्मणांची माहिती देन 'सरस्वतीमंडल' हे पुस्तक गुंजीकरांनी प्रसिद्ध केले. तसेच त्यांनी काव्यलेखन व निबंधलेखनही केले. विस्ताराशी संबंध ठेवून नोकरीचा त्याग करणे अशक्य होते म्हणून त्यांनी विस्ताराचा त्याग केला. पहिल्या पत्नीचा मृत्यू झाला व धुमे घराण्यांतील मुलीशीं त्यांचा द्वितीय विवाह झाला या सौ. सीताबाईपासून त्यांना तीन मुलगे व चार मुली झाल्या.

सुमारे वीस वर्षे गुंजीकर इंस्फिस्टन हायस्कुलात शिक्षक होते. १८८८ साली हुबळी येथील अँग्लोव्हर्न्याक्युलर शाळेमध्ये हेडमास्तर म्हणून त्यांची नेमणूक झाली. १८९२ साली बेळगांव जिल्ह्याचे असिस्टंट डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर या जागेवर त्यांना नेमण्यात आले. तेथेच ते ता. ३१ ऑगस्ट १८९८ रोजी सेवानिवृत्त होईपर्यंत होते. त्यांच्या अखेरच्या दिवसात त्यांच्यावर कौटुंबिक आपर्यन्त आल्या त्यामुळे ते फार चांगले. अशा परिस्थितीतही त्यांच्या लोकोपयोगी कामाला खंड पडला नव्हता. १८ ऑगस्ट १८९९ रोजी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचा जो पहिला वार्षिक महोत्सव झाला. त्यावेळी न्या. मू. रानडे अध्यक्ष व गुंजीकर वक्ते होते. ठाण्याच्या मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या वार्षिकोत्सवाचे अध्यक्ष म्हणून ते १६ जून १९०१ रोजी टाण्याला गेले आणि हा समारंभ आटोपून घरी परत आल्यावर दुसऱ्याच दिवशी सकाळी त्यांना पक्षघाताचा विकार होऊन ता.१८ जून १९०१ रोजी त्यांचा अंत झाला. असा थोडक्यात या मराठी भाषेच्या जाज्वल्य अभिमान्याच्या जीवनाचा व वाङ्:मयकार्याचा वृत्तांत आहे.

**१-१ -१९६५** **- अ. का. प्रियोळकर**

## संदर्भ टीपा


१. अर्वाचीन मराठी साहित्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी - स.दा. कहाडे.

२. अर्वाचीन मराठी साहित्य - वि. हृ. कुलकर्णी.

३. अर्वाचीन मराठी साहित्य - माने-पाटील-जोशी-नेने.

४. अर्वाचीन मराठी गद्याची पर्वापिढीका - प्रा.गं.बा.सरदार.

५. आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग पहिला - अ.ना.देशपांडे, व्हीनस प्रकाशन, आवृत्ती पहिली पुनर्मुद्रण मार्च १९७४.

६. आधुनिक मराठी गद्य - जोशी रा. मि.

७. आधुनिक गद्याची उत्कांती - कृ. भि. कुलकर्णी.

८. धार आणि काठ - नरहर कुरुंदकर, देशमुख आणि कंपनी, पुणे. आवृत्ती चौथी - १९३७.

९. मराठी वाङ:मयाचा इतिहास खंड चौथा - रा.श्री.जोग. महाराष्ट्र साहित्य परिषद प्रकाशन, दुसरी आवृत्ती - १९७३.

१०. मराठी कादंबरीचे पहिले शतक - कुसुमावती देशपांडे. मराठी साहित्य संघ, मुंबई, प्रथमावृत्ती - २० जुलै १९५३.

११. मराठी कादंबरी - कुसुमावंती देशपांडे मराठी साहित्य संघ, मुंबई, प्रथमावृत्ती - २० जुलै १९५३.

१२. मराठी वाङ:मयाचा विवेचक इतिहास, प्र.न.जोशी, प्रसाद प्रकाशन - १८९२ सदाशिव पेठ, पुणे, प्रथमावृत्ती जानेवारी १९७९.

१३. मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास, बापट गोडबोले, व्हीसन प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती सप्टेंबर १९७३.

१४. मराठी गद्याचा इंग्रजी अवतार दत्तो वामन पोतदार, व्हीसन प्रकाशन, पुणे.

१५. मराठी वाङ:मयाचा अभिनव इतिहास : काही लेखक काही साहित्यकृती इ.स. १८०० ते १९२० स्नेहवर्धन प्रकारात, पुणे, प्रथमावृत्ती डिसेंबर १९९१.

१६. मराठी वाङ:मयाचा परामर्श - ग. मा. निरंतर.

१७. मराठी साहित्य समालोचन - वि. स. सरवटे.

१८. मराठी कादंबरी - ल. ग. जोग.

१९. मराठी कादंबरी, मराठी कादंबरी एक चिंतन आणि समिक्षा.

२०. प्रदक्षिणा, रा. श्री. जोग कॉन्टीनन्टल प्रकाशन, पुणे.

२१. मोचनगड रा. मि. गुंजीकर, व्हीसन प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती.

२२. यमुना पर्यटन बाबा पद्मनजी, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे आवृत्ती चौथी, १९३७.